


# पारनेर दर्शन





वर्ष ३ अंक ९६, शुक्रवार ७ मार्च २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## नगर-पुणे रेल्वेमार्गाचा पुण्यात आढावा

### उपमुख्यअभियंत्यांसमवेत खा. लंके यांची बैठक

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**नगर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी महत्वपुर्ण ठरणाऱ्या नगर-पुणे रेल्वे मार्गाला गती देण्यासाठी खासदार नीलेश लंके हे सातत्याने प्रयत्नशिल असून त्या अनुषंगाने त्यांनी या महत्वाकांक्षी प्रकल्पासंदर्भात पुण्यात रेल्वेचे उपमुख्य अभियंत्यांच्या कार्यालयात बैठक घेउन आढावा घेतला. लवकरच या प्रकल्पाच्या कामाला सुरूवात होईल असा विश्वास खा. लंके यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.**



■ नगर-पुणे रेल्वेमार्गासंदर्भात खा. नीलेश लंके यांनी पुणे येथे झालेल्या बैठकीत आढावा घेतला.

या महत्वाकांक्षी प्रकल्पासंदर्भात खासदार नीलेश लंके यांनी संसदेतही लक्ष वेधले होते. या मार्गाचे महत्व स्पष्ट करताना सुपा, रांजणगांव गणपती, कारेगांव या औद्योगिक वसाहती, रांजणगांव गणपती सारखी प्रसिध्द तिर्थक्षेत्रे व इतर अनेक विकासाच्या दृष्टीने महत्वाच्या ठिकाणांचा या मार्गात समावेश असल्याने निदर्शनास आणून दिले. प्रवासी वाहतूक आणि मालवाहतूकीसाठी हा मार्ग अत्यंत फायदेशीर ठरणार असून स्थानिक पातवळीवर मोठया प्रमाणावर औद्योगिक वाढीस मदत होईल असा विश्वास खा. लंके यांनी व्यक्त केला.

या महत्वपुर्ण बैठकीस रेल्वेचे उपमुख्य अभियंता मोहित सिंग यांच्यासह शाखा अभियंता व इतर अधिकारी, तांत्रीक पथक व स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

#### माझा ड्रिम प्रोजेक्ट

**नगर-पुणे रेल्वे मार्ग हा माझा ड्रीम प्रोजेक्ट आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी ही दर्जात्मक आणि गुणवत्तापुर्ण व्हाची यासाठी मी कटीबध्द आहे. या कामामध्ये काही अडचण आल्यास नि:संकोचपणे माझ्याशी संपर्क साधावा. आवष्यकता भासल्यास रेल्वेमंत्री महोदयांशी मी चर्चा करून प्रश्न माग लावण्याचा प्रयत्न करेल अशी ग्वाही खा. लंके यांनी या बैठकीत अधिकाऱ्यांना दिली. या प्रकल्पामुळे नगर व पुणे जिल्ह्यामधील सबंध अधिक मजबूत होणार असून औद्योगिक, धार्मिक आणि मजबूत होणार औद्योगिक, धार्मिक आणि सामाजिक प्रगतीचे नवे पर्व सुरू होणार असल्याच्या प्रतिक्रीया खा. लंके यांनी दिली.**

#### सुप्यात रेल्वे स्थानक, मालधक्का

**या रेल्वेमार्गासाठी भूसंपादन प्रक्रियेला वेग देण्याबरोबर सुपा येथे रेल्वे स्टेशन तसेच मालधक्का उभारणीची मागणी खा. लंके यांनी या बैठकीत केली. सुमारे १२५ किलोमीटर लांबीच्या या रेल्वेमार्गामुळे नगर व पुणे जिल्ह्यातील दळणवळण अधिक सुलभ होणार असून या भागातील नागरीक, उद्योग, शेतकरी,व्यापाऱ्यांसाठी हा प्रकल्प लाभदायक ठरणार आहे.**

## सुप्यातील उद्योजकांना पालकमंत्र्यांचा जाच!

### ■ खा. नीलेश लंके यांची पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांकडे तक्रार
### ■ केंद्र व राज्यातील उद्योग व कामगार मंत्र्यांचेही वेधले लक्ष

**पारनेर : प्रतिनिधी**

**सुपा-पारनेर औद्योगिक वसाहतीमधील उद्योजकांना प्रशासनास वेठीस धरून पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याकडून नाहक त्रास देण्यात येत असल्यासंदर्भात खासदार नीलेश लंके यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्याचे मुख्यमंत्री तसेच केंद्रीय उद्योग मंत्री पियुष गोयल, यांच्याकडे थेट तक्रार केली आहे.**



राज्याचे उद्योग तसेच कामगार मंत्री यांचेही खा. लंके यांनी या प्रकाराकडे लक्ष वेधले आहे. खा. लंके यांनी पाठविलेल्या पत्रात नमुद करण्यात आले आहे की, सुपा-पारनेर औद्योगिक वसाहत दिवसेंदिवस वाढत असून अनेक नवनविन उद्योग या वसाहतीमध्ये येत आहेत. सध्याच्या परिस्थितीमध्ये उद्योजकांना वारंवार नाहक त्रास दिला जात आहे. या त्रासामुळे या वसाहतीमध्ये नव्याने येणाऱ्या उद्योगांवर परिणाम होणार आहे. आणि हे असेच सुरू राहिले तर नव्याने निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधींवर त्याचा गंभीर परिणाम होणार असल्याचे खा. लंके यांनी या पत्रात नमुद केले आहे.

खा. लंके आपल्या पत्रात पुढे म्हणतात, सुपा-पारनेर औद्योगिक वसाहतीमधील स्थानिक कामगार कंत्राटदारांचे परवाणे कोणतेही ठोस करण न देता रद्द करण्यात आले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेले उद्योग तसेच नव्याने सुरू होत असलेल्या उद्योजकांना विनाकारण चुकीच्या नोटीस पाठविण्यात येऊन दबाव टाकण्यात येत आहे. या औद्योगिक वसाहतीमध्ये कोणत्याही प्रकारचे गौण खनिज उत्खनन अनधिकृतपणे सुरू नसतानाही पालकमंत्री महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना उद्योजकांवर चुकीच्या पध्दतीने कारवाई करण्यासाठी करण्यास भाग पाडत आहेत. सदर उद्योजकांना जिल्हाधिकारी कार्यालयात बोलविण्यात येउन धमकावले जात असल्याचा गंभीर आरोप या पत्रामध्ये खा. लंके यांनी केला आहे.

#### उद्योग बंद होतील, बेरोजगारी वाढेल

**सुपा-पारनेर औद्योगिक वसाहतीमध्ये जर असेच प्रकार सुरू राहिले तर गेल्या अनेक वर्षांपासून सुरळीत सुरू असलेल्या व दिवसेंदिवस वाढत असलेल्या या औद्योगिक वसाहतीमध्ये भविष्यात नविन उद्योग येणार नाहीत. किंवा आहेत ते उद्योग बंद होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. त्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न अधिक तिव्र होईल. या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून संबंधितांना योग्य ते आदेश देण्याची विनंती खा. लंके यांनी या पत्राद्वारे केली आहे.**

## आळंदीत पुन्हा एकदा अनैसर्गिक अत्याचार !

### खाजगी वारकरी शिक्षण संस्थेतील घटना

**आळंदी : प्रतिनिधी**

**आळंदीत १५ वर्षीय विद्यार्थ्यांकडे संगीत विषयाच्या शिक्षकाने शरीर सुखाची मागणी केली. घाबरलेल्या विद्यार्थ्याने संस्थाचालकाला ही बाब सांगितली, मात्र त्यांनी कोणतीच कारवाई केली नाही. अखेर विद्यार्थ्याने दिघी पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे.शिक्षकासह संस्था चालकावर ही गुन्हा दाखल केला जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.**



आळंदी आणि परिसरात वारकरी शिक्षण संस्थांमध्ये अनैसर्गिक अत्याचाराच्या घटना वाढत आहेत, म्हणूनचं इथल्या खाजगी शिक्षण संस्था बंद करण्याची ग्रामस्थांची मागणी आहे.जानेवारीपासून हा तिसरा तर आजपर्यंत सात गुन्हे दाखल झाले आहेत.

महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी सुद्धा या प्रकरणाला गांभीर्यानं घेतलं आहे. ४८ तासांमध्ये बेकायदा/अनधिकृत खाजगी वारकरी संस्था बंद करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.होत्या. जिल्हाधिकाऱ्यांनी वीस पथकं नेमून आळंदीत सर्वेक्षणही झालं. मात्र अद्याप किती संस्था बेकायदा/अनधिकृत आहेत. हे समोर आलंच नाही.

## छावा पोहचला ६०० कोटींवर!

### सर्वाधिक कमाई करणारा भारतीय चित्रपट

**पुणे : प्रतिनिधी**

**लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित 'छावा' हा २०२५ मधील सर्वाधिक कमाई करणारा भारतीय चित्रपट ठरला आहे. 'छावा'ने जगभरात ६०० कोटी रुपयांची कमाई केली आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित या ऐतिहासिक चित्रपटात विकी कौशलने मुख्य भूमिका साकारली आहे. हा चित्रपट व्हॅलेंटाइन डे म्हणजेच १४ फेब्रुवारीला जगभरात प्रदर्शित झाला होता.**



माहितीनुसार, तिसऱ्या बुधवारी म्हणजेच २० व्या दिवशी, 'छावा'ने भारतीय बॉक्स ऑफिसवर ६.२४ कोटी रुपयांची कमाई केली. यामुळे भारतातील २० दिवसांची एकूण कमाई ४७८.१४ कोटी रुपये झाली आहे. पहिल्या आठवड्यात 'छावा'ने २१९.२५ कोटी रुपये कमावले होते, तर दुसऱ्या आठवड्यात १८०.२५ कोटी रुपयांचे कलेक्शन केले होते. या आठवड्यातील आतापर्यंतची आकडेवारी पाहता चित्रपट ८० कोटी रुपयांची कमाई करण्याची शक्यता आहे.

हा चित्रपट प्रदर्शित होऊन आता २० दिवस झाले आहे. २० व्या दिवशी चित्रपटाच्या कलेक्शनमध्ये वाढ झाली. या चित्रपटाचे एकूण कलेक्शन जाणून घेऊयात.'छावा' सिनेमा मागील २० दिवसांपासून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. हा चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षक गर्दी करत आहे. मॅडॉक फिल्म्सची निर्मिती असलेल्या या ऐतिहासिक चित्रपटाने जगभरात ६४१.७० कोटी रुपयांचा व्यवसाय केला आहे. यापैकी ७८ कोटी परदेशात कमावले, तर ५६३.७० कोटी भारतात कमावले. चित्रपटाला मिळणारं यश पाहता निर्मात्यांनी तो तेलुगूमध्येही रिलीज केला आहे.

'छावा'मधील कलाकारांबद्दल बोलायचं झाल्यास यात विकी कौशलने छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका केली आहे. महाराणी येसूबाईंच्या भूमिकेत रश्मिका मंदाना व औरंगजेबाच्या भूमिकेत अक्षय खन्ना आहे. कवी कलश हे पात्र विनीत कुमार सिंहने साकारले आहे. या चित्रपटात मराठी कलाकारांची मांदियाळी आहे. संतोष जुवेकर, शुभंकर एकबोटे, निलकांती पाटेकर, सुव्रत जोशी, सारंग साठ्येसह अनेक मराठी कलाकार या चित्रपटात आहेत.

## ३०-४० वेळा मुंडेंना फाशी द्यावी लागेल एवढे पुरावे!

### ■ मनोज जरांगे यांचा दावा ■ किचड म्हणत लक्ष्मण हाकेंवर केली बोचरी टीका

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

**संतोष देशमुख यांच्या हत्येची भयावह फोटो समोर आल्याचे ताजे असतानाचा जालन्यातील अन्वा येथे एका तरुणाला तप्त सळईने चटके दिल्याचा धक्कादायक व्हिडिओ व्हायरल झाला होता. या प्रकरणातील आरोपी मनोज जरांगेंचा उजवा हात असल्याचा आरोप ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केला होता. याबाबत मनोज जरांगेंना पत्रकारांनी विचारले असता, किचडाचे प्रश्न विचारू नका, अशी बोचरी टीका लक्ष्मण हाकेंवर केली. तसेच ३० ते ४० वेळा धनंजय मुंडे यांना फाशी द्यावी लागेल एवढे पुरावे असल्याचा दावा जरांगे यांनी केला आहे.**



जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील अन्वा गावात एका शेतकऱ्यावर मोठा हल्ला करण्यात आला. तरुणाला अर्धनग्न करून लोखंडी रॉडचे चटके देण्यात आले. नवनाथ दौड आणि सोनू उर्फ भागवत दौड यांनी जुन्या वादातून कैलास बोराडे नावाच्या व्यक्तीला चटके देत अमानुष मारहाण केली. या मारहाणीचा व्हिडिओ समोर आल्यानंतर संतापाची लाट उसळली होती. हा प्रकार समोर आल्यानंतर लक्ष्मण हाके यांनी आरोपी नवनाथ दौड हा मनोज जरांगेंचा राइट हँड असल्याचा दावा केला होता. आमच्याकडे फोटो असल्याचेही हाके म्हणाले होते. यावर बोलताना मनोज जरांगे यांनी केवळ उपरोक्त टीका केली.

मनोज जरांगे यांनी आज माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना लक्ष्मण हाकेंनी केलेल्या आरोपाबाबत विचारले असता, किचडाचे प्रश्न विचारू नका, असे ते म्हणाले. आपण चुकीला साथ देत नाही. मी कुणाचेही समर्थन करत नाही. त्या किचडाचे काय काढता? अशी बोचरी टीका लक्ष्मण हाकेंवर केली. आम्ही प्रामाणिक लोक असून आणि सभ्य माणसे आहोत, असेही जरांगे म्हणाले.

मनोज जरांगे यांनी धनंजय मुंडेंवरही भाष्य केले. धनंजय मुंडे हा स्वत:च्या प्रॉपर्टी कराडच्या नावावर ठेवत होता. फडणवीस जेव्हा आरोपीच्या संपत्ती जप्त करतील तेव्हा धनंजय मुंडे यांना त्रास होईल, असा ते म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पुरावे आहेत. एसआयटी आणि सीआयडीकडे पुरावे आहेत. पुनर्तपास होणार. पोलिसांना विश्वासात घेऊन सागर बंगल्यावर बैठक घ्या. पोलिस ट्रक भरून पुरावे देतील. ३० ते ४० वेळा धनंजय मुंडे यांना फाशी द्यावी लागेल एवढे पुरावे आहेत, असा दावा मनोज जरांगे यांनी केला.

#### अधिवेशनात तत्काळ कुणबी प्रमाणपत्र द्या

मनोज जरांगे यांनी या अधिवेशनात मराठा आरक्षणाची अंमलबजावणी करावी, अशी देखील मागणी केली. या अधिवेशनात तत्काळ कुणबी प्रमाणपत्र देवेंद्र फडणवीस यांनी द्यावेत. सगे सोयरे अंमलबजावणी करण्यात यावी. सर्व गुन्हे मागे घेऊ म्हणालेले, पावणे दोन वर्षे झाले. मात्र गुन्हे मागे घेण्याचा शब्द दिला असताना मागे न घेतल्याने गुन्हे मागे घ्या. शिंदे समिती काम करत नाही. अधिकारी विनाकारण वेठीस धरतात. शिंदे समितीला २४ तास कामाला लावावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

#### आम्ही आझाद झालो नाही, पुन्हा पेटून उठणार


मनोज जरांगे म्हणाले की, बलिदान दिलेल्या परिवाराला अद्याप नोकऱ्या दिल्या नाही. आठ मागण्यांपैकी चार मागण्या तत्काळ मान्य करू असे म्हणाले होते. मात्र त्या मागण्या मान्य झाल्या नाही. आम्ही आझाद झालो नसून पुन्हा पेटून उठणार. फडणवीस, मी नंतर कोणत्या टोकाला जाईल, हे मला सांगता येत नाही. त्यामुळे आम्हाला आरक्षण द्या. असा इशारा त्यांनी दिला.



# चंदेरी

## कन्या कावेरीबद्दल शेखर कपूर भावुक!

**र्माता-दिग्दर्शक शेखर कपूर यांची मुलगी ावेरी कपूरने बॉबी और ऋषी की लव्ह स्टोरी या त्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले आहे. ा वेळी वडील शेखर कपूर भावुक झाले. सोशल ोडियावर एक पोस्ट शेअर करताना, ांनी त्यांच्या मुलीच्या वाढत्या याबद्दल सुंदर गोष्टी सांगितल्या**



ावेरीच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या त्रपटातील एक क्लिप इंस्टाग्रामवर ेअर करत शेखर कपूर यांनी ऍप्शनमध्ये मन मोकळे केले. ांनी लिहिले, की कावेरी ाही काळापूर्वीपर्यंत फक्त ान होती. ती कधी मोठी ाली हे मला कळलेही नाही. दाचित एक वडील म्हणून ी ते स्वीकारू शकलो नाही. णाल कोहली दिग्दर्शित बॉबी और ऋषी की व्ह स्टोरीमध्ये कावेरीसोबत अमरीश पुरी ांचा नातू वर्धन पुरी मुख्य भूमिकेत आहे. ालिकडेच कावेरी कपूरने तिच्या बॉलिवूड दार्पणाबद्दल सांगितले. ती म्हणाली, की मकथेवरील चित्रपटात अभिनेत्री म्हणून



काम करणे हे स्वप्न पूर्ण झाल्यासारखे आहे. कुणाल कोहली यांनी कामाच्या वेळी मला फक्त साथ दिली नाही तर मार्गही दाखवला. यामुळे कलाकार म्हणून माझा मार्ग आणि प्रवास सोपा झाला. त्यांचा सल्ला मला माझ्या कारकिर्दीत पुढे नेण्यास मदत करेल. तिच्या सहकलाकार वर्धन पुरीचे कौतुक करताना कावेरी कपूर म्हणाली, की चित्रपटाच्या सुरुवातीच्या काळात वर्धन आणि मी चांगले मित्र झालो आणि अभिनेता म्हणून पदार्पण करताना मला आलेल्या काही आव्हानांना तोंड देण्यासाठी त्याने मला मदत केली. कावेरी कपूर म्हणाली, की या चित्रपटात काम करताना मला खूप मजा आली. जेव्हा आम्ही चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण केले तेव्हा मला खूप वाईट वाटले. या संपूर्ण अनुभवाबद्दल मी खूप आभारी आहे, यामुळे माझ्या आयुष्याची दिशा बदलली, असे ती म्हणाली.

## माझी बहीण रात्री ११ पर्यंत घरी येत नाही तोपर्यंत चिंता वाटते : भूमी पेडणेकर

**अभिनेत्री भूमी पेडणेकर हिने महिलांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. अनेकदा तिला घरातील सदस्यांच्या सुरक्षेबद्दल काळजी वाटते. विशेष करून जेव्हा तिची धाकटी बहीण रात्री ११ ला घरी येते. तोपर्यंज तिला काळजी लागून राहते, असे भूमीने म्हटले आहे.**

भूमी मेरे हसबंड की बीवी या चित्रपटामुळे चर्चेत असून, सध्या ती या चित्रपटाचे प्रमोशन करत आहे. एका मुलाखतीत तिने महिलांवरील हिंसाचाराबद्दल उघडपणे भाष्य केले. प्रसारमाध्यमांत बलात्कार आणि महिलांशी संबंधित बातम्यांना देण्यात येणाऱ्या स्थानावरही तिने आक्षेप घेतला. हे रोज घडणारे आहे, त्यामुळे पहिल्या पानावर स्थान कशासाठी, असे मत तिने व्यक्त केले. २१ फेब्रुवारीला प्रदर्शित झालेल्या मेरे हसबंड की बीवी या चित्रपटाव्यतिरिक्त, भूमी पेडणेकर दलदल या वेब सिरीजमध्ये एका पोलीस अधिकाऱ्याची भूमिका साकारताना दिसणार आहे. ती मुंबईच्या डीसीपी रीता फरेरा यांच्या भूमिकेत दिसणार आहे. त्यांची कहानी दाखवली जाईल. मेरे हसबंड की बीवी चित्रपटात भूमीसोबत अर्जुन कपूर आणि रकुल प्रीत सिंग यांच्या भूमिका आहेत. मात्र गेल्या ३ दिवसांतील या चित्रपटाची कमाई अत्यंत निराशाजनक आहे. ३५ वर्षीय भूमी पेडणेकर मूळची कोकणातील असून, तिचे वडील सतीश पेडणेकर माजी महाराष्ट्राचे माजी मंत्री राहिलेले आहेत. तिने २०१४ साली आलेल्या दम लगा के हैशा या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. या चित्रपटासाठी तिला फिल्मफेअर अवॉर्ड, स्क्रीन अवॉर्ड, झी सिने अवॉर्ड आणि सर्वोत्कृष्ट महिला पदार्पणासाठी इंटरनॅशनल इंडियन फिल्म अकादमी अवॉर्ड मिळाला होता.




### कटू अनुभव...

वयाच्या १४ व्या वर्षी एका अनोळख्या व्यक्तीने चुकीच्या पद्धतीने भूमीला स्पर्श केला होता अन् या गोष्टीचा तिच्या मनावर चांगलाच खोलवर परिणाम झाला. मुलाखतीदरम्यान भूमीने त्या आठवणीबद्दल खुलासा केला आहे. भूमी म्हणाली, की मला अजूनही हे स्पष्टपणे आठवतंय. बांद्रा येथील परिसरात या गोष्टी तेव्हा वरचेवर घडायच्या. मी तेव्हा जवळपास १४ वर्षांची असेन. मी गर्दीत चालत होते अन् मागून कुणीतरी माझ्या पार्श्वभागावर चिमटे काढत होतं. मी मागे वळून पाहिलं पण हे कोण करतंय ते मला कळत नव्हतं, कारण तिथे खूप गर्दी होती. सतत कुणीतरी मला चुकीच्या पद्धतीने स्पर्श करायचा प्रयत्न करत होतं अन् मी त्यामुळे अस्वस्थ झाले होते. त्यावेळी माझ्या सोसायटीमधील इतरही बरीच मुलं होती. त्यामुळे मी त्या घटनेबद्दल कुणालाच सांगू शकले नाही. पण मला नेमकं कसं वाटत होतं हे मी अद्यापही विसरलेले नाही. त्याक्षणी आपण फार घाबरलेले असतो. त्यामुळे अशा परिस्थितीत नेमकं काय करायचं हे आपल्याला कळत नाही, कारण आपल्याबरोबर जे काही घडतंय ते पटवून घ्यायलाच वेळ लागतो.

## अमृता सिंहने घेतला 'इतक्या' कोटींचा फ्लॅट

**प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेत्री व अभिनेता सैफ अली खानची पहिली पत्नी अमृता सिंहने मुंबईतील जुहू येथे एक आलिशान अपार्टमेंट खरेदी केले आहे. या अपार्टमेंटसाठी तिने कोट्यवधी रुपये मोजले आहेत. गेल्यावर्षीही तिने मुंबईत प्रॉपर्टी खरेदी केली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा तिने मुंबईत अपार्टमेंट घेतले आहे.**



अमृता सिंहने फेब्रुवारी २०२५च्या सुरुवातीला अपार्टमेंट खरेदी केलं. या अपार्टमेंची किंमत तब्बल १८ कोटी रुपये आहे. अमृताचे लग्झरी अपार्टमेंट पेनिनसुला बिल्डिंगमध्ये आहे. अमृताने ज्या बिल्डिंगमध्ये हे अपार्टमेंट खरेदी केले, ती बिल्डिंग नूतन लक्ष्मी कोऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीत आहे. या अपार्टमेंटचे क्षेत्रफळ २७१२.९ चौरस फूट आहे. यामध्ये तीन कार पार्किंगची जागा आहे. हे मूव्ह इन अपार्टमेंट आहे. अमृता सिंहने जुहू येथील या अपार्टमेंटसाठी ९० लाख रुपये स्टॅम्प ड्युटी भरली. तसेच तिने ३० हजार रुपये नोंदणी शुल्क भरले. अमृता सिंहने मागील वर्षी म्हणजेच २०२४ मध्ये रिअल इस्टेटमध्ये गुंतवणूक केली होती. तिने अंधेरी पश्चिम येथे २२.२६ कोटी रुपयांची दोन कार्यालये खरेदी केली होती. तिने वीरा देसाई रोडवर असलेल्या सिग्नेचर बिल्डिंगमध्ये वीर सावरकर प्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडकडून ही कार्यालये खरेदी केली होती. याच बिल्डिंगमध्ये अमृताने २०२३ साली चौथ्या मजल्यावर दुसरे ऑफिस घेतले होते. त्यासाठी तिने तब्बल ९ कोटी रुपये मोजले होते. अमृता सिंह ही आता फार चित्रपट करत नाही. ती अनेक वर्षांपासून चित्रपट आणि अभिनयापासून दूर आहे, परंतु भरपूर गुंतवणूक करत आहे. अमृताची मुलगी सारा अली खान ही बॉलीवूडमधील आघाडीची अभिनेत्री आहे. लवकरच अमृताचा मुलगा व साराचा भाऊ इब्राहिम अली खान बॉलीवूडमध्ये पदार्पण करणार आहे. या दोन्ही भावंडांच्या कमाईतूनही अमृता गुंतवणूक करत आहे. अमृता मुलगा इब्राहिम व साराबरोबर राहते. तिचा पूर्वाश्रमीचा पती सैफ अली खानने करीना कपूरशी दुसरं लग्न केलं. तो करीना व दोन्ही मुलांबरोबर वांद्रे येथे राहतो.

## काळजी घेण्यासाठी कोणीच नाही : अक्षय खन्ना

**बॉलिवूड अभिनेता अक्षय खन्ना सध्या छावा चित्रपटाच्या यशाचा आनंद घेत आहे. यात त्याने औरंगजेबाची भूमिका साकारली आहे आणि सर्वजण त्याचे कौतुक करत आहेत. पडद्यावर तो ज्या संयमाने प्रभाव निर्माण करतो ते पाहून प्रत्येकजण थक्क होतो. अक्षय खन्ना ४९ वर्षांचा आहे आणि त्याने अद्याप लग्न केलेले नाही.**

अक्षय म्हणतो, की त्याला कधीही लग्न करायचे नाही. तो लग्नासाठी योग्य नाही. एवढेच नाही तर मूल दत्तक घेण्याचाही विचार नाही. व्हायरल क्लिपमध्ये, तो स्वतःला



भाग्यवान म्हणत आहे. कारण त्याच्यावर कोणत्याही मोठ्या जबाबदाऱ्या नाहीत. मी आनंदी आहे. मी एकटा आहे. कोणतीही जबाबदारी नाही. माझी काळजी करायला कोणी नाही. मला स्वतःची काळजी करावी लागेल. हे जग एक अद्भुत जीवन आहे. एकदम हुशार. अक्षय अभिनेता विनोद खन्ना आणि गीतांजली खन्ना यांचा मुलगा आहे. आई-वडील वारलेले आहेत. त्याच्या भावाचे नाव राहुल खन्ना आहे आणि तो देखील एक अभिनेता आहे. अक्षय खन्ना एकटाच राहतो. त्याचे नाव करिश्मा कपूर, ऐश्वर्या राय, श्रिया सरन, तारा शर्मा आणि उर्वशी शर्मा सारख्या अभिनेत्रींशी जोडले गेले होते.

## यशने सुरू केले रामायणचे शूटिंग



कन्नड सुपरस्टार यशने रणबीर कपूर आणि साई पल्लवी स्टारर 'रामायण' चित्रपटाचे चित्रीकरण सुरू केले आहे. नितेश तिवारी दिग्दर्शित या चित्रपटात यश रावणच्या भूमिकेत दिसणार आहे. रामायणमध्ये रणबीर कपूर भगवान रामाची भूमिका साकारत आहे, तर साई पल्लवी माता सीतेची भूमिका साकारताना दिसणार आहे. रणबीर आणि साई पल्लवी यांनी मुंबईत त्यांच्या भागांचे चित्रीकरण आधीच केले आहे. आता यशनेही त्याच्या भूमिकेचे चित्रीकरण सुरू केले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, यश २१ फेब्रुवारी रोजी शूटिंग सेटवर आला. सध्या त्याचे लक्ष युद्धाच्या दृश्यांवर आहे, जे मुंबईतील अक्सा बीचवर चित्रित केले जातील. यानंतर, चित्रपटाचे पुढील चित्रीकरण दहिसरमधील एका स्टुडिओमध्ये होईल. ॲक्शन कोरिओग्राफी जबरदस्त आहे. या दृश्यांमध्ये ग्रीन स्क्रीन तंत्रज्ञान आणि व्हीएफएक्सचाही मोठ्या प्रमाणात

- **रावणाच्या भूमिकेत दिसणार**
- **खऱ्या सोन्याचे कपडे घालणार**

वापर करण्यात आला आहे. तथापि, रणबीर कपूर या टप्प्याचा भाग असणार नाही. कारण त्यात राम आणि रावण यांच्यातील समोरासमोरील युद्धाचे दृश्य नाही. या चित्रपटात यश खास पोशाखांमध्ये दिसणार आहे. त्याचे कपडे खऱ्या सोन्याच्या जरीपासून बनलेले आहेत. पौराणिक कथेनुसार, रावणाचे राज्य लंका हे सुवर्णनगरी मानले जात होते, म्हणून चित्रपटातील त्याचे कपडे त्यानुसार डिझाइन केले आहेत. रामायण दोन भागात बनवले जात आहे. पहिला भाग २०२६ च्या दिवाळीला प्रदर्शित होईल, तर दुसरा भाग २०२७ च्या दिवाळीला प्रदर्शित होईल. रामायणमध्ये यशसोबत रणबीर कपूर, साई पल्लवी, लारा दत्ता, सनी देओल आणि इंदिरा कृष्णा हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत.

## प्राजक्ता लग्न दोन दिवसांवर, नवरा नेपाळी

**मराठमोळी अभिनेत्री प्राजक्ता कोळी लग्नबंधनात अडकणार आहे. प्राजक्ता तिच्या नेपाळी बॉयफ्रेंड वृषांक खनालशी लग्न करणार आहे. तिच्या लग्नाची तारीख समोर आली आहे. महत्त्वाचं म्हणजे दोघेही कर्जतमध्ये लग्न करणार आहेत.**



प्राजक्ता व वृषांक १३ वर्षांपासून एकमेकांना डेट करत होते. दोन वर्षांपूर्वी त्यांनी साखरपुडा केला होता. आता त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला आहे. हे जोडपं २५ फेब्रुवारी २०२५ रोजी लग्नबंधनात अडकणार आहे. मेहंदी, हळदी आणि संगीत नाईटनंतर हे दोघेही लग्न करतील. त्यानंतर रिसेप्शन सोहळा आयोजित केला जाईल. लग्नाचे कार्यक्रम आज, २३ फेब्रुवारीपासून सुरू झाले असून, २५ फेब्रुवारीला लग्न आहे. लग्नाचे सर्व सोहळे कर्जतमध्ये होणार आहेत. प्राजक्ता व वृषांकबद्दल बोलायचं झाल्यास प्राजक्ता अभिनेत्री नव्हती, त्याआधीपासून ते एकत्र आहेत. वृषांक हा काठमांडू, नेपाळचा आहे आणि एका मित्राच्या माध्यमातून त्याची प्राजक्ताशी ओळख झाली होती. गणपती पूजेदरम्यान दोघेही एकमेकांना भेटले होते. इथेच वृषांकने प्राजक्ताला डेटसाठी विचारलं होतं, त्यानंतर दोघांच्या भेटीगाठी वाढल्या आणि ते प्रेमात पडले. वृषांक हा वकील आहे. प्राजक्ता ही लोकप्रिय युट्यूबर आहे. मोस्टली सेन या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्राजक्ताचे लाखो फॉलोअर्स आहेत. युट्यूब व्हिडीओ बनवणाऱ्या प्राजक्ताने नंतर अभिनयात नशीब आजमावलं आणि त्यात तिला यश मिळालं. ती 'मिसमॅच्ड' या सीरिजसाठी ओळखली जाते. यात तिने डिंपल आहुजा हे पात्र साकारले आहे. या सीरिजचे आतापर्यंत तीन सीझन आले आहेत. प्राजक्ता आता लेखिकादेखील झाली आहे. नुकतंच तिचं पहिलं पुस्तक प्रकाशित झालं.

## रेखा नेहमी साडी नेसण्याबद्दल म्हणतात..

ज्येष्ठ अभिनेत्री रेखा या वयातही प्रचंड सुंदर दिसतात. तरुणींनाही लाजवेल, असं सदाबहार सौंदर्य रेखा यांचं आहे. रेखा प्रत्येक कार्यक्रमात साडी नेसून जातात. मग तो अवॉर्ड शो असो, कुणाचं लग्न असो वा बॉलीवूडमधील एखादा इव्हेंट असो. रेखा यांच्या साड्या आणि त्यांची साडी नेसण्याची पद्धत दोन्हीची बरीच चर्चा होते. रेखा क्वचितच साडीशिवाय इतर पोशाख परिधान करतात. इतर अभिनेत्रींप्रमाणे त्या वेगवेगळे पोशाख का घालत नाहीत, असा प्रश्न चाहत्यांना पडतो. एका कार्यक्रमादरम्यान रेखा यांनी स्वतः नेहमी साडी नेसण्यामागचं कारण सांगितलं होतं. रेखा म्हणाल्या, की खरं सांगायचं तर मी कांजीवराम साडी का नेसते किंवा मी साडीच का घालते हे खूप पर्सनल आहे. तुम्हाला सिक्रेट जाणून घ्यायचे आहे का? माझ्यासाठी स्टाइल ही बाह्य गोष्ट नाही, ती एक भावना आहे, असं रेखा म्हणाल्या होत्या. ती माझी परंपरा आहे, ते माझं मूळ आहे. साडी मला माझ्या आईची आठवण करून देते. जेव्हा मी कांजीवरम साडी नेसते तेव्हा मला प्रेम, संरक्षण आणि खूप सॉफ्टनेस जाणवते, असं रेखा म्हणाल्या.

## इशिता दत्ता होणार आई!

**अभिनेता अजय देवगणची ऑनस्क्रीन लेक आई होणार आहे आणि 'टार्झन' चित्रपटात अजयच्या मुलाची भूमिका करणारा वत्सल शेठ दुसऱ्यांदा बाबा होणार आहे. 'दृश्यम' चित्रपटांमध्ये अजय देवगणच्या मोठ्या मुलीची भूमिका साकारणारी अभिनेत्री इशिता दत्ता पुन्हा गरोदर आहे.**

इशिता व वत्सल यांना एक मुलगा आहे. त्याचं नाव वायू आहे. त्याचा जन्म २०२३ मध्ये झाला होता. आता वत्सलने लवकरच तो दुसऱ्यांदा बाबा होणार आहे, अशी माहिती दिली. इशिताने त्याला दुसऱ्या प्रेग्नेन्सीबद्दल कशी माहिती दिली आणि ते ऐकल्यानंतर त्याची प्रतिक्रिया काय होती, हे वत्सलने सांगितलं. वत्सल म्हणाला, की हे माझ्यासाठी सरप्राईज होते आणि या सरप्राईजने मी खूप खूश आहे. जेव्हा इशिताने मला प्रेग्नेंसीबद्दल सांगितलं 'Ohh Waah' अशी माझी प्रतिक्रिया होती. मला काहीच कळत नव्हतं. बाबा म्हणून माझ्यासाठी ही खूप मोठी बातमी होती, त्यामुळे मला खूप आनंद झाला. इशिता आमच्या खोलीत आली आणि तिने मला ही बातमी दिली होती. मला आठवतंय इशिताने त्या दिवसांमध्ये सांगितलं, जेव्हा वायू खूप चिडचिड करायचा. आमच्या कुटुंबात नवीन सदस्य जुलैमध्ये येणार आहे. आम्ही लोकांना याबद्दल सांगण्यापूर्वी थोडा वेळ घेतला. आम्ही यावर चर्चा केली, कारण दुसरी गर्भधारणा निश्चितपणे पहिल्यापेक्षा खूप वेगळी असते, असं वत्सलने नमूद केलं.



### इशिता दत्ता म्हणाली...

इशिता म्हणाली, की यावेळी आम्ही जास्त आनंदी आणि उत्साही आहोत. वायूसोबत प्रत्येक अनुभव नवीन होता. मला आठवतं की मी अनेकदा डॉक्टरांकडे जायचे, पण यावेळी माझ्या डॉक्टरांना मी जास्त वेळा फोन करत नाही याचं मलाच आश्चर्य वाटतंय. माझे आई- वडील आमच्याबरोबर राहायला आले आहेत. त्यामुळे माझ्या घरी चांगली सपोर्ट सिस्टीम आहे. इशिता व वत्सल यांच्या नात्याबद्दल बोलायचं झाल्यास दोघांनी काही वर्षे एकमेकांना डेट केल्यावर २०१७ साली लग्न केलं होतं. लग्नानंतर सहा वर्षांनी त्यांनी पहिल्या बाळाचं स्वागत केलं होतं.

## शॉर्ट न्यूज

### वडगाव गुप्ता शिवारातून मुलीचे अपहरण

**नगर :** १६ वर्षीय अल्पवयीन मुलीस एका इसमाने आमिष दाखवून फूस लावून पळवून नेल्याची घटना एमआयडीसी परिसरातील वडगाव गुप्ता शिवारात घडली. अल्पवयीन मुलगी घरात दिसून न आल्याने तिच्या घरच्यांनी तिचा वडगाव गुप्ता परिसरात, तिच्या मैत्रिणीकडे व नातेवाईकांकडे चौकशी करत शोध घेतला. मात्र ती कोठेही मिळून आली नाही. यावरून तिचे एका इसमाने अपहरण केले असल्याची त्यांची खात्री झाली. त्यानंतर तिच्या नातेवाईकांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

### माकपच्या प्रदेश सचिवपदी डॉ. अजित नवले

**अकोले :** परभणी जिल्ह्यात सेलू येथे सीपीआय (एम) च्या २४ व्या महाराष्ट्र राज्य पक्ष अधिवेशनाची यशस्वीरित्या सांगता झाली. या अधिवेशनात अकोले येथील डॉ. अजित नवले यांची नवीन राज्य सचिव म्हणून एकमताने निवड करण्यात आली. पॉलिट ब्युरो सदस्य आणि पक्षाचे समन्वयक प्रकाश कारत, निलोत्पल बसू आणि डॉ. अशोक ढवळे या अधिवेशनास उपस्थित होते. राज्यातील २९ जिल्ह्यांतील एकूण ३३७ प्रतिनिधींनी या अधिवेशनात सहभाग घेतला, ज्यामध्ये ६३ महिला होत्या.

### कांदे काढणीची कामे वेगाने सुरू

**पुणतांबा :** परिसरात सध्या कांदा काढणीची सुरु युद्धपातळीवर सुरु आहे. चालू वर्षी परिसरात समाधानकारक पाऊस पडलेला होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्गाने कांद्याची लागवड केली होती. परिसरात चालू वर्षी किमान ८०० ते ९०० एकर क्षेत्रावर कांद्याची लागवड झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. पावसामुळे काही शेतकऱ्यांची कांद्यांची रोपे खराब झाली होती. त्यांनी दुसऱ्याकडून रोपे विकत घेऊन कांद्याची लागवड केली होती. ज्या शेतकऱ्यांची ऑगस्ट लागवड केली होती, त्या पिकाची काढणी सुरु झाली आहे.

### श्रीगोंदेकरांची पाण्यासाठी वणवण

**श्रीगोंदा :** पालिकेच्या नियोजनशून्य कारभारामुळे उन्हाची पर्वा न करता पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ श्रीगोंदेकरांवर आली आहे. अनेक वसाहतींमध्ये तब्बल पाच दिवसांपासून पाणीपुरवठा झालेला नाही. पर्यायी व्यवस्था करण्यातही पालिका प्रशासन अपयशी ठरल्याने पाण्यासाठी रस्त्यावर हंडे घेऊन नागरिक फिरत आहेत. एक वर्षापूर्वी नगराध्यक्ष, सदस्यांचा कार्यकाळ संपला आहे. श्रीगोंदा पालिकेचा सध्या प्रशासकीय कारभार सुरू आहे. अजब कारभारामुळे पाच दिवसांपासून पालिकेचा पाणीपुरवठा बंद असून शहरात पाण्यासाठी नागरिकांची भटकंती सुरू झाली आहे.

### राज्यस्तरीय रिंग टेनिस स्पर्धेत विजेतेपद

**संगमनेर :** शासकीय विज्ञान महाविद्यालय, चामोर्शी रोड, जिल्हा गडचिरोली येथे घेण्यात आलेल्या शालेय राज्यस्तरीय रिंग टेनिस स्पर्धेत श्रमिक कनिष्ठ महाविद्यालयाच्या १९ वर्षाखालील मुलांच्या संघाने विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत पैयावुल मयूर रमेश, उगले तन्मय भागवत, पवार, राधेय विजय, अमृत माधव राहणे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विजयी संघाचे शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी, सचिव अनिल राठी, प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड, उपप्राचार्य डॉ. राजेंद्र ढमक सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केले.

# बालविज्ञान प्रदर्शनातून नव्या कल्पनांचा उदय

## डॉ. दत्ता पोंदे यांचे प्रतिपादन । स्नेहालय बालभवनच्या विज्ञान प्रदर्शनाला प्रतिसाद



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**बालविज्ञान प्रदर्शनातून नवीन कल्पनांचा उदय होतो. भविष्यात या कल्पना समाजाच्या समृद्धीसाठी, पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि विविध आव्हानांवर मात करण्यासाठी उपयुक्त ठरतील, असे प्रतिपादन डॉ.दत्ता पोंदे यांनी प्रतिपादन केले.**

बालभवनातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, या हेतूने प्रेरित होऊन त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, नवनिर्मिती क्षमता, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनविणे, या सुप्त गुणांना वाव मिळावा या उद्देशाने वर्ष सोळावे '' नवीन कल्पना, नवे संशोधन- या थीमवर आधारित विज्ञान प्रदर्शन व पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे आयोजन डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम बालभवन, सिद्धार्थनगर या ठिकाणी केले होते. या विज्ञान प्रदर्शनामध्ये इयत्तानुसार इयत्ता पहिली ते पाचवी व सहावी ते नववी अशा दोन गटात विभागणी करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री समर्थ विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका शारदा होशिंग, प्राचार्या माहेश्वरी गावित, सामाजिक कार्यकर्ते गणेश घोरपडे, स्नेहालयचे विश्वस्त राजीव गुजर आदी उपस्थित होते. डॉ. यंदाच्या विज्ञान प्रदर्शनाची थीम ''नवीन कल्पना, नवे संशोधन'' ही होती. वैज्ञानिक दृष्टिकोन, नवनिर्मिती क्षमता, तसेच टाकाऊतून टिकाऊ या संकल्पनांना वाव देण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यात आले. स्नेहालय संचलित बालभवन प्रकल्पाच्या वतीने आयोजित १६व्या विज्ञान प्रदर्शन व पारितोषिक वितरण कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमात ३५४ बालकांनी सहभाग घेतला. विविध नाविन्यपूर्ण वैज्ञानिक प्रयोगांचे सादरीकरण करण्यात आले.

प्रदर्शनात शारदा होशिंग व डॉ दत्ता पोंधे यांनी विज्ञान प्रदर्शनातील प्रयोगांचे निरीक्षण करून मूल्यमापन केले. यात उर्जा बालभवनाच्या लहान गटात भौमितिक आकृत्या या प्रयोगास प्रथम क्रमांक पटकावला, डॉ. कलाम बालभवनच्या गणिताच्या अपूर्णांक या प्रयोगास द्वितीय क्रमांक तर उत्कर्ष बालभवनच्या पाण्याची पातळी या प्रयोगास तिसरा क्रमांक मिळाला.

मोठ्या गटात परीस बालभवनच्या रामानुजन मॅजिक या प्रयोगास प्रथम क्रमांक, क्षितीज बालभवनच्या हायड्रोलिक ब्रिज या प्रयोगास द्वितीय क्रमांक, डॉ.हळबे बालभवनच्या रासायनिक अभिक्रिया या प्रयोगास तृतीय क्रमांक मिळाला. उत्तेजनार्थ बक्षीस छत्रपती संभाजीनगरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या न्युटनची तबकडी, व मलालाबालभावनच्या इलेक्ट्रिक सेफ्टी कल्पना या प्रयोगास देण्यात आला.प्रथम तीन क्रमांक आलेल्या व उत्तेजनार्थ दोन गटास प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शालेय साहित्यरुपी बक्षीस वितरण करण्यात आले. व सहभागी सर्व बालकांना प्रशस्ती पत्राचे वाटप करण्यात आले.

प्रास्ताविक स्नेहालय अनिवासी प्रकल्पाचे संचालक हनीफ शेख यांनी, सूत्रसंचालन प्रतीक्षा साळवे व राजू पांढरे यांनी, तर आभार बालभवन प्रकल्पाच्या संचालिका वैशाली चोपडा यांनी मानले.विद्यार्थ्यांनी दिला पर्यावरण संरक्षणासंदर्भात प्रभावी संदेश या प्रदर्शनात ३२ प्रयोगांचे विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. विद्यार्थ्यांनी वनस्पती व प्राणी पेशी, ज्वालामुखी, भागाकार मॉडेल, इलेक्ट्रॉनिक बेल, सीड जर्मिनेशन, चांद्रयान-३, हवेचा दाब, रेनवॉटर इन्व्हर्टर, वायूचा दाब यांसारखे प्रयोग सादर करून आपली वैज्ञानिक कौशल्ये दाखवली. पर्यावरण संरक्षणासंदर्भात प्रभावी संदेश देत टाकाऊपासून टिकाऊ निर्मितीवर भर दिला.

# जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांची कामे वेळेत पूर्ण करा

## मंत्री गुलाबराव पाटील यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**



**उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर सर्व गावांमध्ये पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पाणी पुरवठा योजनांची कामे गतीने पूर्ण करण्याचे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.**

अहिल्यानगर जिल्ह्यातील तसेच शेवगाव पाथर्डी मतदारसंघातील गावाच्या पाणी पुरवठा योजनेचा आढावा घेतला. यावेळी ते बोलत होते. यावेळी पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, आमदार मोनिका राजळे, पाणीपुरवठा विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव अभिषेक कृष्णा यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी तसेच अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते.

यावेळी शेवगाव पाथर्डी व परिसरातील गावात प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांतर्गत सुरु असलेल्या कामांचाही आढावा घेण्यात आला. ही सर्व कामे गतीने पूर्ण करावीत. योजना अंमलबजावणीतील अडचणी तत्परतेने दूर कराव्यात. त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्थानिक आमदार, सरपंच तसेच शिक्षण समिती अध्यक्ष यांच्यासोबत बैठक घेऊन आढावा घ्यावा. गावातील शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात, पाण्याची टाकी बसवण्यासाठी जागा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. उन्हाळा सुरु होण्याच्या पार्श्वभूमीवर पाण्याची टाकी बसवण्याची कामे तातडीने सुरू करावी. तसेच गावात विहित मुदतीत काम पूर्ण न केलेल्या कंत्राटदारांवर नियमानुसार दंड आकारण्यात यावा. सर्व गावात योजना अमंलबजावणीसाठी उपयुक्त जागा पाहणी करून त्याची माहिती संबंधितांनी आढावा बैठकीत सादर करावी, अशा सूचना पाटील यांनी दिल्या.

# शिफारशीने मिळालेला आयोग कार्पोरेट पाट्यापुरता!

## । भुरट्याताई सुद्धा शब्द काढत नाही
## । चित्रा वाघ अन् चाकणकरांवर अंधारेंची टीका



**मुंबई : प्रतिनिधी**

**भाजपचे आमदार आणि मंत्री जयकुमार गोरे यांनी एका महिलेला स्वत:चे विवस्त्र फोटो पाठवल्याचा आरोप ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला होता. या आरोपांवरून राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली. यानंतर विरोधकांकडून सरकारवर टीका करण्यात येत आहे. ठाकरे गटाच्या सुषमा अंधारे यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर आणि भाजपच्या महिला प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांच्यावर नाव न घेता जोरदार हल्ला चढवला आहे. शिफारशीने मिळालेला आयोग कॉर्पोरेट पाट्यापुरता राहिला आहे, अशा शब्दांत सुषमा अंधारे यांनी निशाणा साधला.**

जयकुमार गोरे यांच्यावर होत असलेल्या आरोपानंतर सुषमा अंधारे यांनी नाव न घेता संदर्भ देत रुपाली चाकणकर आणि चित्रा वाघ यांच्यावर टीका केली. याबाबत त्यांनी ट्विट केले आहे. विषय भाजपच्या किरीटचा असो किंवा जयकुमार गोरेंचा. शिफारशीने मिळालेला आयोग कॉर्पो रेट पाट्यापुरता आहे, अशा शब्दांत नाव न घेता सुषमा अंधारे यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यावर निशाणा साधला. तसेच, एरवी चित्रविचित्र आवाज काढत आक्रस्ताळेपणा करणाऱ्या छोट्या भुरट्या ताई सुद्धा गोरेबद्दल चकार शब्द काढत नाही, असे म्हणत चित्रा वाघ यांच्यावरही बोचरी टीका केली. हे सगळे नग म्हणजे एका माळेचे मणी अन् ओवायला नाही कुणी असा प्रकार आहे, अशा शब्दांत सुषमा अंधारे यांनी महायुतीमधील या दोन महिला नेत्यांवर संताप व्यक्त केला आहे.

**आपण गोरेमुंडेकोकाटे हे विषय लावून धरायचे**

अबू आझमींच्या औरंगजेबावरील वक्तव्यावरून मागील दोन दिवसांपासून सुरू असलेल्या गोंधळावर भाष्य करत आपल्याला डायव्हर्ट व्हायचे नाही, असेही सुषमा अंधारे यांनी म्हटले आहे. धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यामुळे सरकार पूर्णतः बॅक फुटवर गेले आहे. लक्षात ठेवा ते अबू आजमीऔरंगजेब म्हणत आपल्याला डायव्हर्ट करायचा प्रयत्न करतील. आपण गोरेमुंडेकोकाटे हे विषय लावून धरायचे आहेत, असे आवाहन सुषमा अंधारे यांनी केले.

# सशस्त्र दरोड्यातील चौघे ताब्यात

## ४ लाख ३४ हजारांचा मुद्देमाल हस्तगत



**श्रीरामपूर : प्रतिनिधी**


**तालुक्यातील खानापूर येथील वस्तीवर सशस्त्र दरोडा टाकणारे चौघे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून ४ लाख ३४ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपींना पुढील तपासासाठी श्रीरामपूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.**

बबलू भास्कर जाधव (वय ३२, रा.चांदेकसारे, ता.कोपरगाव), सोनु दगडू पवार (वय २५, रा.सावळीविहीर, ता.राहाता), पंकज भाऊसाहेब सोनवणे (वय २५, रा.नगदवाडी, ता.कोपरगाव) सुनिल कडू पवार (वय २६, रा.खानापूर, ता.श्रीरामपूर), असे ताब्यात घेतलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता आकाश धनू माळी (रा.नगदवाडी, ता.कोपरगाव), व सोहम उर्फ समाधान माळी (रा. संगमनेर), दोघे पसारा) यांनी मिळून केला असल्याची त्यांनी सांगितले. तसेच हा गुन्हा सुनिल कडू पवार यांच्या सांगणेवरून केला असल्याचे तपासात पुढे आले.

मुंबई येथे नगररचना विभागात अधिकारी असलेले जितेंद्र भोपळे यांच्या श्रीरामपूर तालुक्यातील खानापूर येथे असलेल्या वस्तीवर सहा जणांच्या कोयता गँगने दरोडा टाकला होता. यावेळी घरात एकट्या असलेल्या वृध्द महिलेला मारहाण करत कोयत्याचा धाक दाखवून २४ तोळे सोन्याचे दागिने व ६० हजार रूपयांची रक्कम लुटून नेल्याचा गुन्हा श्रीरामपूर पोलीस ठाण्यात दाखल होता.

या गुन्ह्याचा समांतर तपास करता असता स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना मिळालेल्या माहितीनुसार हा गुन्हा पंकज सोनावणे याने त्याच्या साथीदारांसह केला असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने कोपरगाव परिसरात सापळा रचून आरोपीस मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले.ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे तुषार धाकराव व पोलीस अंमलदार बापुसाहेब फोलाणे, मनोहर गोसावी, गणेश भिंगारदे, संदीप दरंदले, रमीजराजा आत्तार, फुरकान शेख, मेघराज कोल्हे, प्रशांत राठोड, प्रमोद जाधव, अरूण मोरे व महादेव लगड यांच्या पथकाने केली.

# एमआयडीसी परिसरात अतिक्रमणांवर कारवाई



**नगर : प्रतिनिधी**

**अहिल्यानगर मधील एमआयडीसी परिसरातील अतिक्रमणांवर बुधवारी एमआयडीसी पोलीस, औद्योगिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कारवाई करण्यात आली. एमआयडीसीतील सनफार्मा चौक ते निंबळक चौकापर्यंतच्या रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्यात आली.**

यावेळी उपअभियंता संदीप बगाडे, अनिल पांढरे, सहायक आरेखक प्रदीप शिरसाठ, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी, किशोर जाधव, साईनाथ टेमकर, संदीप चव्हाण, पोपट आढाव, उमेश शेरकर, राजेंद्र सुद्रिक आदी उपस्थित होते. एमआयडीसी येथील सनफार्मा चौक चे निबंळक चौक तसेच एम ब्लॉक, एल ब्लॉक, वखार महामंडळ परिसरातील अतिक्रमण हटविण्यात आली.

# सरकारी, निमसरकारी कर्मचारी आणि शिक्षक-शिक्षकेतरांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे

**नगर : प्रतिनिधी**

**प्रलंबीत मागण्यांकरिता राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने (महाराष्ट्र राज्य) गुरुवार (दि. ६ मार्च) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे सत्याग्रह करण्यात आले. या आंदोलनात सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून हक्कांच्या मागण्यांसाठी जोरदार निदर्शने केली. तर या आंदोलनातून सरकारला तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.**



सकाळी दोन तास झालेल्या या धरणे सत्याग्रहात समन्वय समितीचे जिल्हा निमंत्रक रावसाहेब निमसे, राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, उपाध्यक्ष विलास पेद्राम, विजय काकडे, राजेंद्र आंधळे, अशोक मासाळ, सुरेखा आंधळे, ग्रामसेवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष युवराज पाटील, सचिव अशोक नरसाळे, शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे, मुख्याध्यापक शिक्षक संघाचे अध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित, जिल्हा कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेचे अध्यक्ष सोपानराव कदम, राजेंद्र जाधव, महानगर माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष उद्धव गुंड, शिक्षकेतर महामंडळाचे गोवर्धन पांडुळे, बी.एस. थोरात, उज्वला भागवत, संदिपान कासार, भागवत नवगण, वैशाली बोडखे, देविदास पाडेकर, अरविंद वाव्हळ, व्ही.डी. नेटके, डी.ए. गजभार, श्रीमती एम.एस. बाचकर, एम.बी. साठे, प्रकाश जायभाय, जालिंदर खाकाळ, डी.बी. चेडे, अविनाश ठोकळ, सयाजीराव वाव्हळ, भाऊ शिंदे आदी सहभागी झाले होते.

विविध हक्कांच्या मागण्यांसाठी राज्य सरकारकडून दुर्लक्ष होत आहे. चर्चासत्र, पत्र व्यवहार करुन देखील शासनाची प्रलंबीत मागण्यांसाठी उदासीनता दिसून येत आहे. या विरोधात तीव्र संघर्षाचे रणशिंग फुंकण्यापूर्वी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सकाळच्या सत्रात हे आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्त्यांनी आपल्या भाषणात सरकार फक्त कर्मचाऱ्यांच्या हक्काच्या मागण्यांसाठी दिरंगाईची भूमिका घेत आहे. अनेक जागा रिक्त असून, त्याचा भार इतर कर्मचाऱ्यांवर पडत आहे. सरकारच्या दिरंगाईमुळे त्यांचे जीवन धोक्यात आल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. तर शासनाच्या कर्मचारी विरोधी धोरणाचा यावेळी निषेध नोंदविण्यात आला.

सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अंमलबजावणी करण्याबाबतचे विस्तृत परिपत्रक तात्काळ जारी करण्यात यावे, खुल्लर समितीचा अहवाल तात्काळ प्रसिद्ध करावा, पीएफआरडीए कायदा रद्द करण्यात यावा, फंड मॅनेजर कडे संचित झालेली रक्कम संबंधित राज्य सरकारला परत करण्यात यावी, ईपीएस ९५ नुसार असणाऱ्या सर्व वर्गणीदारांना परिभाषित पेन्शन योजना लागू करण्यात यावी, सर्व कंत्राटी, रोजंदारी, अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित कराव्या, सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण रद्द करून सरकारी विभागांचे संकुचिकरण तात्काळ थांबवावे, आठव्या वेतन आयोगाची सत्वर स्थापना करण्याबाबत केंद्र शासनाकडे आग्रह धरावा अन्यथा प्रत्येक पाच वर्षाच्या कालावधीनंतर वेतनमान पुनर्रचनेसाठी राज्याचा स्वतंत्र आयोग नेमावा, सर्व सरकारी कर्मचारी, निवृत्तीवेतनधारक, कंत्राटी, रोजंदारी कर्मचारी यांना सर्व हॉस्पिटल मध्ये कॅशलेस उपचार मिळावे यासाठी व्यापक स्वास्थ विमा योजना लागू करावी, जाचक नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण रद्द करावे, संविधानातील कलम ३१०, ३११ (२) ए बी आणि सी रद्द करावे, नवीन तीन क्रिमिनल कायदे रद्द करावे, संविधानात निर्देशित असणारी धर्मनिरपेक्षता अबाधित ठेवावी, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी विना अनुदान, अंशत: अनुदानावर नियुक्त तसेच २००५ नंतर शंभर टक्के अनुदानावर लागलेल्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, सरकारी कर्मचाऱ्यांवर कर्तव्य बजावत असताना होणाऱ्या भ्याड हल्ल्याविरुद्ध कठोर कारवाई करावी, सर्व वर्गातील रिक्त पदे भरण्यात यावी, चतुर्थ श्रेणी कर्मचारी वाहन चालक भरतीवरील बंदी तात्काळ उठवावी, चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना नियुक्ती देण्यासंदर्भातील १९८१ चा शासन निर्णय निर्णयाची पुनर्स्थापना करण्याची मागणी आंदोलकांनी केली. सदर मागणीचे निवेदन प्रभारी जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांना देण्यात आले.

# नाना पाटेकर रविवारी निघोजमध्ये

## वृक्ष बँकेच्या उद्घाटन सोहळ्याचे आयोजन



**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज येथील वृक्ष बँकेचा उद्घाटन सोहळा रविवार दि.९ रोजी सिनेअभिनेते नाना पाटेकर यांच्या हस्ते संपन्न होणार असल्याची माहिती वृक्षप्रेमी पोपटराव रसाळ यांनी दिली आहे.**

याबाबत अधिक माहिती देताना रसाळ सांगितले की, निघोज गावातील स्मशानभूमीतील वृक्ष बँकेचा उद्घाटन सोहळा रविवार दि.९ मार्च रोजी दुपारी साडेतीन वाजता ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे ,पद्मश्री पोपटराव पवार ,प्रसिद्ध सिनेअभिनेते नाना पाटेकर, प्रसिद्ध सिनेअभिनेते व पर्यावरण प्रेमी सयाजी शिंदे , सिनेलेखक अरविंद जगताप, खासदार नीलेश लंके, माजी खासदार सुजय विखे,आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते व प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

या सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या राष्ट्रीय कार्यामध्ये सहभाग नोंदवावा तसेच मीडिया सेंटरचे उद्घाटन साडेचार वाजता शिववाडी या ठिकाणी संपन्न होणार आहे. अशी माहिती रसाळ यांनी दिली आहे.

# धारदार तलवार बाळगणारा आरोपी जेरबंद

## सुपा पोलिसांची कारवाई



**सुपा : प्रतिनिधी**

**धारदार तलवार जवळ बाळगून दहशत निर्माण करणाऱ्या आरोपीला सुपा पोलिसांनी रांजणगाव मशिद येथून मोठ्या शिताफीने जेरबंद केले.**

या बाबतची माहिती अशी की, बुधवार दि.५ रोजी सायंकाळी ५ च्या सुमारास सुपा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांना गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली की, रांजणगाव मशीद ता. पारनेर गावात शिंदे मळा येथे अजय कैलास शिंदे हा आपल्या ताब्यात धारदार तलवारी सारखे हत्यार बाळगत असून दहशत निर्माण करत आहे. तुम्ही आलात तर तो मिळून येईल. त्याचा शोध घेऊन त्याला ताब्यात घ्या अशी माहिती मिळाली.

या माहितीनंतर सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी तातडीने पथक तयार करून आरोपीच्या शोधार्थ रांजणगाव मशीद येथे पाठवले असता सदर पथकाने शिंदे मळा येथील त्याच्या राहत्या घरी कसोशीने आरोपींचा शोध घेतला असता एक धारदार तलवारीचे हत्यार मिळून आले.पोलिसांनी दोन पंचासमक्ष पंचनामा करून ते हत्यार ताब्यात घेतले.सदर पथकात पोसई कानगुडे, पोलिस कॉन्स्टेबल सातपुते,पोकॉ साळवे आदी सहभागी झाले होते.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलिस अधिकारी संपतराव भोसले, सहायक पोलिस निरीक्षक सोमनाथ दिवटे, पोसई कानगुडे, पोकॉ योगेश सातपुते, पोकॉ साळवे, पोकॉ गायकवाड यांनी ही कारवाई केली.

# आ.दाते यांचा पिंपळगाव रोठा येथे सत्कार

## । त्र्यंबकेश्वर महादेव मंदिराला सभामंडप देणार । आ.काशिनाथ दाते यांची ग्वाही

**पिंपळगाव रोठा : प्रतिनिधी**

**पिंपळगावरोठा ग्रामस्थांनी माझ्यावर विश्वास दाखवून मतदान केले,माझे या गावाशी पूर्वीपासून घनिष्ट संबंध आहेत २०१७ साली मी जेंव्हा जिल्हा परिषदला निवडून आलो त्यावेळीही या गावातून मला येथील त्र्यंबकेश्वर महादेव देवस्थानचा आशीर्वाद मिळाला. त्यावेळी महाशिवरात्रीला ग्रामस्थांनी माझा सत्कार केला होता.या महाशिवरात्रीला ही मी आता आमदार म्हणून निवडून आलो असताना श्री त्रिंबकेश्वर महादेवाचा आशीर्वाद घेण्यास आलो आहे.असे प्रतिपादन आ. काशिनाथ दाते यांनी केले.**




पिंपळगाव रोठा ग्रामस्थांनी आमदार म्हणून निवडून आल्यानंतर प्रथम गावात आल्याबद्दल त्यांचा सत्कार खंडोबा देवस्थानचे माजी अध्यक्ष ॲड पांडुरंग गायकवाड यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला.त्यावेळी ते बोलत होते.ते पुढे म्हणाले पिंपळगावरोठा येथील गावठाणातील प्रसिद्ध पुरातन देवस्थान श्री.त्रंबकेश्वर महादेव मंदिराला मी माझ्या आमदार निधीतून सभा मंडप देणार असल्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

यावेळी आकाश महाराज घोलप, खंडेश्वर वारकरी शिक्षण संस्था सर्व विद्यार्थी,पिंपळगाव रोठा, आदित्य महाराज बोरुडे,श्रवण महाराज पानसरे,सुभाष महाराज लांडगे,स्वराज महाराज घोलप तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# विद्यार्थिनींनी आत्मनिर्भर व्हावे

## ■ प्राचार्य डॉ. संभाजी पठारे यांचे प्रतिपादन ■ पारनेर महाविद्यालयात निर्भय कन्या अभियान




**पारनेर : प्रतिनिधी**

**सध्याच्या युगात विद्यार्थिनींनी आत्मनिर्भर होण्याची गरज असल्याचे सांगत निर्भय कन्या अभियान कार्यशाळाची उत्पत्ती, महत्त्व व व्याप्ती याबद्दलची सखोल माहिती चास येथील आडसुळ आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ.संभाजी पठारे यांनी दिली.**

पारनेर येथील न्यू आर्ट्स,कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय व विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने निर्भय कन्या अभियान या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.रंगनाथ आहेर होते. डॉ. संभाजी पठारे पुढे म्हणाले, करिअर करताना कोणत्या सकारात्मक बाबींकडे लक्ष देणे, नकारात्मक बाबी कशा पद्धतीने दूर कराव्यात तसेच विद्यार्थिनींनी आत्मनिर्भर कसे व्हावे याचे मार्गदर्शन केले.

याप्रसंगी दुसऱ्या सत्रात डॉ. वर्षा पुजारी यांनी महिलांच्या आरोग्याविषयी असणाऱ्या समस्या व त्यावर कोणते उपाय करावेत आरोग्याची कशी काळजी घ्यावी या संदर्भात मार्गदर्शन केले. तर तिसऱ्या सत्रात सानिया शेख यांनी स्वतःचे संरक्षण हाताच्या दहा बोटांनी आपण कसे करू शकतो याचे विद्यार्थिनींना प्रशिक्षण दिले. आयुष्य जगत असताना कोणत्या अडचणी कशा पद्धतीने सोडवायच्या याबद्दल मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर, उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घुंगर्डे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. रवींद्र देशमुख, डॉ. विजया ढवळे,प्रा.प्रतीक्षा तनपुरे उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यशाळेच्या समन्वय प्राध्यापक राणी सोनवणे यांनी केले.तर आभार प्रांजली बोरुडे तसेच सूत्रसंचालन नेहा आढाव हिने केले.

# चिंचोलीत मराठी भाषा गौरव दिन साजरा

## गणेश युवा सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने आयोजन



**चिंचोली : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील चिंचोली येथील श्री.गणेश युवा सार्वजनिक वाचनालयात जेष्ठ साहित्यिक वि.वा. शिरवाडकर तथा कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.**

ज्येष्ठ साहित्य कवी वि .वा शिरवाडकर तथा कवी कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस असतो.महाराष्ट्र शासनाच्या वतीने कवी कुसुमाग्रज यांचा जन्म दिवस देशभर मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने चिंचोली येथील श्री. गणेश युवा सार्वजनिक वाचनालयात मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने पुस्तक वाचन पुस्तक वितरण आदी उपक्रम घेण्यात आले.

चिंचोली येथील श्री.गणेश युवा सार्वजनिक वाचनालयात मान्यवरांनी कवी कुसुमाग्रजांना अभिवादन केले त्यानंतर शालेय विद्यार्थीनी मराठी पुस्तके वाचली. यावेळी नामदेव भगत प्रमोद झंजाड, रामदास घोरपडे, संजय झंजाड, शशिकांत झंजाड, जयश्री झंजाड, साई सातपुते, रियांस सरडे सह शाळेतील मुले व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते. ग्रंथपाल शशिकांत झंजाड यांनी उपस्थित सर्वाचे आभार मानले.

# संदीप रोहोकले रयतचे सल्लागार सदस्य

## विविध उपक्रमांची घेतली दखल

**भाळवणी : प्रतिनिधी**



**भाळवणी येथील युवा उद्योजक संदीप प्रभाकर रोहोकले यांची रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाच्या सल्लागार मंडळाच्या सदस्यपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे.**

रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाचे विभागीय अध्यक्ष आमदार आशुतोष काळे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच संस्थेची सहविचार सभा संपन्न झाली.या सभेत सर्वानुमते संदीप रोहोकले यांची सल्लागार समितीच्या सदस्यपदी बिनविरोध निवड करण्यात आली. संदीप रोहोकले हे भाळवणी येथील महात्मा फुले विद्यालयाच्या स्कूल कमिटीचे सदस्य आहेत. त्यांनी या विद्यालयासाठी वेगवेगळ्या संकल्पना राबविल्या आहेत.

शिक्षक,विद्यार्थी व पालकांसाठी त्यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या ओपन डे या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला असून हा उपक्रम संपूर्ण उत्तर विभागात राबविला जात आहे.याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी सभागृहाची रचना केली असून लवकरच लोकसहभागातून हे सभागृह साकारणार आहे. त्याचप्रमाणे या विद्यालयामध्ये विविध वक्त्यांचे व्याख्याने, मॅरेथॉन स्पर्धा याचे देखील त्यांनी आयोजन केले आहे.या सर्व कार्याची दखल घेऊन त्यांची सल्लागार समितीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

या निवडीबद्दल खासदार नीलेश लंके, माजी आमदार दादाभाऊ कळमकर, ज्ञानदेव पांडुळे ,गंगाराम रोहोकले मुरलीदादा रोहोकले,बाबासाहेब तरटे,आबासाहेब चेमटे, बबलूशेठ रोहोकले,संभाजी रोहोकले,प्रा.बबनराव भुजबळ, शंकर रोहोकले, डी.के.रोहोकले यांनी या निवडीचे स्वागत केले आहे.

# शारीरिक विकासात क्रीडा स्पर्धांचे योगदान महत्वाचे

## ■ डॉ. कुंदा कवडे यांचे प्रतिपादन ■ अळकुटी महाविद्यालयात प्रवरा क्रीडा महोत्सव



**अळकुटी : प्रतिनिधी**

**आपल्या शारीरिक क्षमतांचा वापर करण्याचा एक आनंददायी मार्ग म्हणजे खेळ. खेळांमध्ये सातत्यपूर्ण सहभाग नेहमीच शारीरिक आरोग्य सुधारण्यासाठी सिद्ध झाला आहे. नियमित सहभाग निरोगी वजन राखण्यास, स्नायू तयार करण्यास आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी तंदुरुस्ती वाढविण्यास मदत करतो. महाविद्यालय पातळीवरील क्रीडा स्पर्धा या विद्यार्थ्यांना प्राथमिक व्यासपीठ प्राप्त करून देत असतात. प्रवरा क्रीडा महोत्सव ही अळकुटी महाविद्यालयाची परंपरा आहे. एकूणच शारीरिक विकासात क्रीडा स्पर्धांचे योगदान महत्वाचे आहे असे प्रतिपादन प्राचार्या डॉ. कुंदा कवडे यांनी केले.**

पद्मभूषण लोकनेते डॉ.बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अळकुटी येथे प्रवरा क्रीडा महोत्सवाचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कुंदा कवडे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

याप्रसंगी डॉ. कवडे म्हणाल्या की, मोठमोठे ऑलम्पिकवीर हे देखील महाविद्यालय पातळीपासूनच क्रीडा प्रकारात आपले नाव कमवत आले आहे. म्हणूनच महाविद्यालय पातळीपासून विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारात सहभाग नोंदवला पाहिजे असे म्हटले. याप्रसंगी क्रिकेट, धावणे, गोळा फेक, शॉट पुट, उंच उडी, लांब उडी, बुद्धिबळ आदी स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

यावेळी उपप्राचार्य अमोल नालकर, डेअरी डिप्लोमा प्राचार्य प्रशांत लोखंडे, प्रा.अर्जुन चाटे, प्रा. सुषमा करकंडे, डॉ. शांता थोरात, गोरख घोलप, सूर्यमाला भोर, प्रा. विशाल रोकडे, प्रा. संजय जाधव, प्रा. रावसाहेब झावरे, प्रा. संदीप गेटम, प्रा. पोपट सुंबरे, प्रा. पूजा वैरागर, प्रा. सुनिता जाधव, प्रा. विनायक सोनवणे, प्रा. दत्तात्रय शेळके, प्रा. अनुराधा गाढवे, प्रा. स्वाती फापाळे, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. प्रियंका दिवटे, प्रा. शर्मिष्ठा बोरूडे, प्रा. पांडुरंग उघडे, प्रा. शिवाजी शेळके, प्रा. मच्छिन्द्र बेलोटे, प्रा. मोहन माने, प्रा. सचिन बलसाने, प्रा. ऋषिकेश गिते, प्रा. सुप्रिया पारखे, प्रा. राजाराम गोरडे, सुनिता भालेराव, नितीन घोलप, छाया म्हस्के, विकास सोनवणे, राहुल बोरुडे, सागर शितोळे, मनोहर कनिंगध्वज व विद्यार्थी उपस्थित होते.

विज्ञान मंडळाच्या प्रमुख प्रा. पूजा वैरागर यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशेष श्रम घेतले. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत क्रीडा विभागप्रमुख प्रा. राजाराम गोरडे यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. विशाल रोकडे यांनी केले. तर आभार प्रा. अर्जुन चाटे यांनी केले.

# पारनेर तालुक्यात चित्रकला कार्यशाळेचे आयोजन

## प्रसिद्ध चित्रकार सुरेश भोसले यांची माहिती

**निघोज : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यात चित्रकला कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार असून यामध्ये दरोडी, निघोज, पारनेर, अळकुटी येथे या कार्यशाळेचे आयोजन करुण पारनेर तालुक्यातील निसर्ग व पर्यटन तसेच प्रत्यक्ष व्यक्तीरेखा चित्रकलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दाखवून चित्रकलेची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांना ही कार्यशाळा एक चित्रकला पर्वणी राहाणार असल्याची माहिती मुंबई येथील प्रसिद्ध चित्रकार सुरेश भोसले यांनी दिली आहे.**



श्री.भोसले यांनी नुकतीच निघोज येथील पत्रकार संघ विभागीय कार्यालयाला सदिच्छा भेट दिली यावेळी मुख्य समन्वयक दत्तात्रय उनवणे यांनी त्यांचा सत्कार करुन त्यांना सन्मानित केले. यावेळी दिनेश भोसले, संतोष भोसले, दिपक भोसले आदी उपस्थित होते. सुरेश भोसले हे दरोडी गावचे असून ते मुंबईत स्थायिक झाले असून चित्रकलेच्या माध्यमातून गेली वीस वर्षांपासून त्यांचा मोठा लौकिक निर्माण झाला आहे. मुंबई येथील जहांगीर आर्ट गॅलरी येथे प्रसिद्ध कलादालनात त्यांना चार वेळा चित्रप्रदर्शन भरविण्याची संधी मिळाली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पहिल्याच चित्रकाराला ही संधी मिळाली आहे.

हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, लोकसभेचे माजी सभापती व माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष व माजी केंद्रीय मंत्री शरद पवार, शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, राज्याचे व केंद्रीय आजी माजी मंत्री, आजी माजी खासदार व आमदार तसेच सिनेसृष्टीतील दिग्गज कलाकार यांनी या चित्रप्रदर्शनाला भेट देऊन भोसले यांचे कौतुक केले आहे. चित्रकलेची आवड असणाऱ्या असंख्य चित्र शौकिनांनी या प्रदर्शनाला भेट देऊन लाखो रुपये किंमतीचे चित्र घेऊन या चित्रप्रदर्शनाला मोठा प्रतिसाद मिळाला आहे.

आपला गाव आपला तालुका ही संकल्पना मनात धरुन भोसले यांनी पारनेर तालुक्यात विविध ठिकाणी चित्रकला कार्यशाळेचे आयोजन केले असून साधारण येत्या एक दोन महिन्यात मुंबई येथील प्रसिद्ध चित्रकारांची वेळ घेऊन जवळपास पंचवीस ते तीस चित्रकारांना तालुक्यात आणून या चित्रकला कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. जेणेकरून चित्रकलेची आवड असलेल्या विद्यार्थ्यांना राज्यात व देशात चित्रकार म्हणून काम करण्याची संधी मिळेल हा उद्देश असल्याची माहिती भोसले यांनी दिली आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com